माहितीचा अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील

**अपील क्रमांक : ३११/२०२२**

**अपिलार्थी, श्रीमती रुचिका गणपत लेन्डे**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक,**
जिल्हा व सत्र न्यायालय, नागपूर

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा न्यायाधीश-१ व अति. सत्र न्यायाधीश,**
जिल्हा व सत्र न्यायालय, नागपूर

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ११.०३.२०२४**

**अपीलकर्ता : उपस्थित**
**जन माहिती अधिकारी : उपस्थित**
**प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित (प्रतिनिधी)**

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १२.११.२०२१ | १३.१२.२०२१ | ०४.०१.२०२२ | १३.०१.२०२२ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक १२.११.२०२१** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी " १) मा. उच्च न्यायालय, मुंबई कडुन मंजुर झालेली दि. २३.०६.२०२१ च्या यादीमध्ये अनु.क्र.०१ ते १५ मध्ये दिव्यांग किती आहे. २) १४२ मध्ये दिव्यांग किती आहे. ३) शिक्षण पात्र यादी देणे १४२ ची व १४२ मध्ये सेवायोजन कार्यालयातील किती अर्ज आहे त्यांची नावे देणे ४) अनु.क्र.१ ते १५ मध्ये दि. २३.०६.२०२१ च्या यादी अनु.०२ उच्च न्यायालयात अधिसुचना नियम/एक्स२३१९/७० दि. २० नोव्हेंबर, २०१९ नुसार ०१ टक्के पदे दिव्यांग व्यक्तीसाठी आरक्षित ठेवण्यात येत आहे. जाहिरात नुसार त्या अपंग व्यक्ती नाव व अपंग प्रमाणपत्र देणे, शिक्षण देणे." इ. माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी संबंधिताकडून प्राप्त झालेली माहिती अपिलार्थीस दिनांक १३.१२.२०२१ रोजी पुरविण्यात आलेली आहे. त्यात मुद्दा क्र. १ बाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई कडून मंजूर झालेली दिनांक २३.०६.२०२१ च्या यादीमध्ये अनु.क्र.०१ ते १५ मध्ये दिव्यांग व्यक्ती नाही. मुद्दा क्र. २ बाबत १४२ मध्ये ०२ दिव्यांग नावे समाविष्ट आहेत. मुद्दा क्र. ३ बाबत दिनांक

०१.०१.२०२१ रोजीच्या जाहिरातीमध्ये अनुक्रमांक ३ पात्रतेचे निकषा मध्ये दिल्याप्रमाणे प्राधान्य गटात मोडणाऱ्या उमेदवारांना स्वच्छता व क्रियाशिलता चाचणी करीता बोलविण्यात आले होते. गोपनीयता राखण्यासाठी त्यांचे शिक्षण देणे शक्य होणार नाही. तसेच सेवायोजन कार्यालयातून अर्ज प्राप्त झाले नाही. तसेच मुद्दा क्र. ४ बाबत स्वच्छता व क्रियाशिलता चाचणीकरीता पात्र झालेल्या १४२ उमेदवारांची यादीमध्ये २ दिव्यांग नावे समाविष्ट होती. परंतु दोन्ही व्यक्ती गैरहजर राहिल्यामुळे दिव्यांग व्यक्तीचा समावेश पुढील प्रक्रियेमध्ये नव्हता. त्यामुळे त्यांचे नाव, प्रमाणपत्र व शिक्षण देणे शक्य होणार नाही, असे नमूद केले आहे.

तद्नंतर अपिलार्थी यांनी **दिनांक ०४.०१.२०२२ रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे "समाधानकारक माहिती मिळाली नाही " असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. सदर प्रथम अपील अर्जावर प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा न्यायाधीश-१, जिल्हा व सत्र न्यायालय, नागपूर यांनी दिनांक १३.०१.२०२२ रोजी सुनावणी घेवून सविस्तर आदेश पारीत केले आहे. त्यात जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती याबाबत सविस्तर ऊहापोह केला असून त्यात स्वच्छता व क्रियाशिलता चाचणीकरीता पात्र झालेल्या १४२ उमेदवारांची यादीमध्ये २ दिव्यांग व्यक्तीची नावे समाविष्ट होती. परंतु दोन्ही व्यक्ती चाचणी परीक्षेत गैरहजर असल्यामुळे त्यांच्याविषयीचा तपशिल उघड करणे संयुक्तिक होणार नाही, असे जन माहिती अधिकारी यांचे प्रतिपादन योग्य असल्याचे नमूद केले आहे. तसेच महाराष्ट्र जिल्हा न्यायालय माहिती अधिकार (सुधारीत), अधिनियम २००९ चे नियम १३ (a) अन्वये अशा प्रकारची माहिती उघड करणे हे त्यांच्या खाजगीपणाच्या हक्काचा भंग होण्याची आशंका त्यांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे उपलब्ध असलेली सर्व माहिती अपिलार्थी यांना यापुर्वीच पुरविली असल्याचा निष्कर्ष काढून प्रथम अपील अर्ज निकाली काढला आहे.

त्यानंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक ०४.०२.२०२२ रोजी** " आवश्यक माहिती न मिळाल्यामुळे (माझा अपंगाचा अर्ज होता २ जागा असतांना एकालाही घेतले नाही) " असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपील अर्ज आयोग कार्यालयास दिनांक ०४.०२.२०२२ रोजी प्राप्त झाला आहे. त्यावर आज दिनांक ११.०३.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आलेली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक, श्री. वि.कृ. सोनटक्के उपस्थित आहेत. तसेच विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांचेतर्फे जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक, श्री. वि.कृ. सोनटक्के उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास आले की, प्रस्तूत प्रकरणी अपिलार्थी यांना अभिलेखावर उपलब्ध असलेली माहिती कलम २(च) नुसार देय असलेली माहिती यापुर्वीच देण्यात आलेली असून जोडपत्र-क मध्ये नमूद केलेली बाब म्हणजेच त्यांचा अपंगाचा अर्ज होता, २ जागा असतांना एकालाही घेतले नाही. तथापि, अपिलार्थी यांनी साद केलेल्या जोडपत्र-अ, ब व क चे अवलोकन केले असता, त्यावर तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी तात्काळ देण्यात आलेला प्रतिसाद व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी पारीत केलेला सविस्तर आदेश तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या लेखी खुलाश्यात प्रथमदर्शनी तथ्य आढळून येते. सदर प्रकरणी उपलब्ध असलेली माहिती यापुर्वीच अपिलार्थीस प्रदान केलेली असून अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र-क मध्ये दिव्यांग पदासाठी राखीव असलेली नोकरी मिळाली नसून सदर बाब ही त्यांनी दाखल केलेल्या जोडपत्र-अ चा भाग नाही.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ **कलम २(च) नुसार माहिती याचा अर्थ कोणत्याही स्वरुपातील दस्ताऐवज अभिलेख, ज्ञापने, ई-मेल,** अभिप्राय, सुचना, प्रसिध्दीपत्रके, परिपत्रके, आदेश, अहवाल नमुने, कागदपत्रे, कोणतीही ईलेक्ट्रॉनीक स्वरुपातील आधार सामग्री इत्यादीचा समावेश होतो. माहिती अधिकार अधिनियमातील तरतूदीनुसार एखादया विषयावर सल्ला मागणे, एखादी कार्यवाही पूर्ण करुन माहिती देणे, एखादया कार्यवाही मागील खुलाशा अथवा कारण देणे, प्रश्नार्थक माहिती देणे, एखादया कार्यवाहीची अपेक्षा करणे इत्यादी बाबीचा या व्याख्येमध्ये समावेश होत नाही. एखाद्या व्यक्तीला नोकरी का देण्यात आलेली नाही, याबाबतची कारणमिमांसा जाणुन घेणे अथवा पदभरतीचे पुर्नविलोकन करणे, ही बाब माहितीचा अधिकार कायद्याच्या कार्यकक्षेत येत नसल्यामुळे दाखल केलेला व्दितीय अपील अर्ज तथ्यहिन असून फेटाळण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

**व्दितीय अपील अर्ज फेटाळण्यात येत आहे.**

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर
महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर
★ नागपूर ★

(राहुल भा.पांडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : ११.०३.२०२४**

2 3 AUG 2024

जावक क्रमांक E3EE ------------- दिनांक ------------------------